91

**जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय**
**(पुरवठा विभाग)**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या समोरील कामकाज
महिती अधिकार अधिनियम 2005 चे कमल 19( 1) खालील प्रथम अपील प्रकरण

---

**क्रमांक 2014/ महिती अधिकार/ अधिनियम/ अपील/ कावि 881** 4634

श्री दयानंद बाबुराव कुंभार — अपिलार्थी
रा.एमआयडिसी समोर निलंगा
ता.निलंगा जि. लातूर

**विरुध्द**

जन महिती अधिकारी तथा अव्वल कारकुन पुरवठा/ 6 केरोसीन — उत्तरार्थी

**<u>निर्णय</u>**

अपिलार्थी श्री दयानंद बाबुराव कुंभार रा निलंगा यांनी मा. जिल्हाधिकारी यांचे नावे माहिती अधिकाराखाली दिनांक 20.01.2014 रोजीचा अर्ज दिनांक 24.01.2014 रोजी पोस्टाने सादर केला आहे. दिनांक 20.01.2014 रोजीचे अर्जान्वये मागणी केलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली नसलेने अपिलार्थी यांनी मूळ अर्जाप्रमाणे लेखी स्वरुपात माहिती देणे बाबत असे अपिलाचे कारण नमुद करुन अपील दाखल केले आहे. अपिलार्थी यांचा अपिल अर्ज प्राप्त झालेनंतर अपीलार्थी, उत्तरार्थी यांना या प्राधिकारणाने क्रमांक/ 2014/ पुवि/ अपील /कावि-880 दिनांक 21.04.2014 नुसार सुनावणीची नोटीस काढण्यात येवून दिनांक 29.04.2014 रोजी सकाळी 11.30 वाजाता सुनावणी ठेवण्यात आली असले बाबत संबधिताना कळविण्यात आले. दिनांक 29.04.2014 रोजीच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी स्वत: उपस्थित राहिले. अपिलार्थी स्वत: उपस्थित जनमाहिती अधिकारी यांनी त्याच्या युक्तीवादात अपिलार्थी यांनी मूळ अर्जात पुढील माहितीची मागणी केली आहे.

1 मा.संस्थापक अध्यक्ष अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यासचा जिल्हा दक्षता समिती, अशासकीय सदस्य व सहकार समिती सदस्य या दोन समितीचे निवडीसाठीचे चारित्रय प्रमाणपत्र देण्यात यावे.

2 या समितीच्या सदर व्यक्तींच्या निवडी झाल्यापासून किती बैठका झाल्या बैठकीची उपस्थिती त्यांनी मांडलेले विषय कोणते होते.

3 त्यांनी किती धान्य कोठार व स्वस्त धान्य दुकानदारास भेटी दिल्या त्यातून जनतेस काय न्याय मिळाला

4 त्यांना भेटी देण्यासाठी शासकीय भत्ता मिळतो काय

5 त्यांचे प्रवासाचे साधन काय व स्वत:चे उत्पन्न काय आहे सदर वस्तूस्थितीवर झालेला खर्च देण्यात यावा

वरील तपशिलाप्रामणे खर्च व चारित्रय प्रमाणपत्र निवड झाल्यापासून आजतागायत मागणी केली आहे सदरील माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली नाही माझयाकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यात येईल असा युक्तीवाद जनमाहिती अधिकारी यांनी केला अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तीवादात मागणी केलेली माहिती देण्यात यावी असे म्हणणे मांडले. जनमाहिती अधिकारी व अपिलार्थी यांचा युक्तीवाद यावरुन हे प्राधिकरण खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

1अपीलार्थी यांचे अपील अंशत: मान्य करण्यात येते.

2अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने अशी माहिती देण्याची तरतुद माहिती अधिकार अधिनियमात नाही.

3जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली त्यांच्या संकलनाकडे उपलब्ध असलेली माहिती आठ दिवसात विनामुल्य देण्यात यावी..

4 निम्न स्वाक्षरीत प्रथम अपिलीय अधिकारी यांचे अपिलीय प्राधिकारी मा. राज्य माहिती आयुक्त खंडपिठ औरंगाबाद हे असून निर्णयाच्या दिनांकापासून अपिलीय कालावधी 90 दिवसाचा आहे.

5 मा. राज्य महिती आयुक्त यांचे कार्यालयाचा पत्ता बचत भवन लेखा व कोषागारे भवनच्या पाठीमागे औरंगाबाद

स्थळ : लातूर

दिनांक : 06.05.2014

06/05/2014

(डॉ. प्रतिभा गोरे )

अपिलीय अधिकारी

तथा

सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी लातूर

**अग्रेषित**

1 श्री दयानंद बाबुराव कुंभार रा एमआयडिसी समोर निलंगा ता. निलंगा

2 जन महिती अधिकारी तथा अव्वल कारकुन पुरवठा 6 केरोसीन जिल्हा पुरवठा कार्यालय लातूर

3 जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी यांनाhttp:/latur.nic.in या संकेतस्थळावर upload करीता देण्यात येते